# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना कमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com


गो.वि./म.वि / 934/2022 दिनांक: 24/01/2022

अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित

## परिपत्रक

विषय :– तात्काळ माहिती सादर करण्याबाबत

संदर्भ :– मा. शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) पुणे यांचे पत्र क्रमांक. उशिसं/मवि.–१/विद्यार्थीनी–सुरक्षा /२०२१/७५७ दिनांक २१/०१/२०२२

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्नित सर्व अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, अध्यक्ष/सचिव तथा संबंधिताना कळविण्यात येते कि, मा. शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) पुणे यांच्या पत्रानुसार राज्यातील महाविद्यालय परिसरात विद्यार्थीनींवर होणाऱ्या छेडछाडीच्या घटनेच्या अनुषंगाने सदर परिसर छेडछाड मुक्त तसेच सायबर गुन्हे मुक्त करण्याबाबतचे प्राप्त पत्राच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील संबंधित माहिती खालील मुद्दयांच्या आधारे दिनांक २४/०१/२०२२ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत महाविद्यालयीन विभागाच्या **college.section@unigug.ac.in** या ई–मेल आय–डी वर **Excel file** मध्येच **Kruti Dev 55** या **Font** मध्ये **Soft Copy** व **Hard** कॉपीसह तातडीने विद्यापीठात आजच सादर करावी.

महाविद्यालयाचे नांव————————————————————

| अ. क्र. | विचारण्यात आलेली माहिती | सादर करावयाची माहिती |
|---|---|---|
| १. | महिला तक्रार निवारण समिती महाविद्यालयांमध्ये स्थापन केली आहे काय ? | |
| २. | विद्यार्थीनींच्या छेडछाडीच्या संदर्भात महाविद्यालय परिसरात मागील दोन वर्षात किती गुन्हयांची नोंद झालेली आहे? | |
| ३. | या गुन्हयांची सद्यस्थिती ? | |
| ४. | किती गुन्हे निकाली निघाले आहेत ? | |
| ५. | छेडछाडीच्या घटना व सायबर गुन्हे होऊ नये म्हणुन करण्यात येत असलेल्या उपाययोजना ? | |

मा. प्र–कुलगुरु यांच्या आदेशानुसार

(डॉ. जी. डी. दुबे)
प्र.उपकुलसचिव(म.वि)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी:–

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहायक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र–कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. ...... दि. ............
जावक क्र. 946 दि. 24.1.22


# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे- ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९/२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११५३


क्र.:उशिसं/मवि-१/विद्यार्थीनी-सुरक्षा/२०२१/ 646 दिनांक- /१/२०२२

**कालमर्यादीत** 21 JAN 2022

प्रति,

१. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे- महाराष्ट्र राज्य.

२. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

३. प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय महाविद्यालये/संस्था,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 1882 दिनांक 24.1.2022
जावक क्र. ............ दिनांक ............

**विषय: राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालये परिसरात विद्यार्थीनींवर होणा-या छेडछाडीच्या घटनेच्या अनुषंगाने हा परिसर छेडछाड मुक्त तसेच सायबर गुन्हे मुक्त करण्याबाबत.**

संदर्भ: शासनपत्र क्र.:बैठक-२०२२/प्र.क्र.२७/विशि-३ दि. २०.१.२०२२

मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या उपस्थितीत उपरोक्त विषयाबाबत दि. २०.१.२०२२ रोजी सर्व विद्यापीठांचे कुलगुरु/ कुलसचिव व संबंधितांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत प्राप्त निर्देशानुसार सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये महिला तक्रार निवारण समिती स्थापन करणे व छेडछाडीच्या गुन्हांच्या अनुषंगाने खाली नमुद मुद्याप्रमाणे शासनास माहिती सादर करणेस उक्त संदर्भीय शासन पत्रान्वये कळविले आहे. तरी खाली नमुद मुद्याची माहिती दि. **२५.१.२०२२ पर्यंत** या संचालनालयास सादर करण्यात यावी.

१. महिला तक्रार निवारण समिती किती महाविद्यालयांमध्ये स्थापन केली आहे?
२. विद्यार्थीनींच्या छेडछाडीच्या संदर्भात विद्यापीठ व महाविद्यालयीन परिसरात मागील दोन वर्षात किती गुन्हयांची नोंद झालेली आहे?
३. या गुन्हयांची सद्यस्थिती?
४. किती गुन्हे निकाली निघाले आहेत?
५. छेडछाडीच्या घटना व सायबर गुन्हे होऊ नये म्हणून करण्यात येत असलेल्या उपाययोजना.

प्रत्येक विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्याबाबत यापुर्वीही सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरीही काही महाविद्यालयांमध्ये अद्याप महिला तक्रार निवारण

AR (College Section)

24.1.2022

समितीची स्थापन केलेली नसल्यास त्यांना तात्काळ समिती स्थापन करण्याबाबत विभागीय सहसंचालक कार्यालयांकडून संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

सर्व अकृषी विद्यापीठे व विभागीय सहसंचालक यांनी उपरोक्त प्रश्नांबाबतची मुद्देसूद माहिती **दिनांक २५.२.२०२२** पर्यत सादर करणे अनिवार्य आहे. विभागीय सहसंचालक कार्यालयांकडून महाविद्यालयांना माहिती या संचालनालयास पाठविण्याबाबत कळविण्यात येऊ नये. आपल्या कार्यकक्षेतील सर्व संलग्नित (शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालये) महाविद्यालयांची माहिती आपल्या स्तरावर संकलित करुन विभागीय सहसंचालक कार्यालयाचा एकत्रित अहवाल सादर करावा. सदर माहिती या संचालनालयाच्या mavi.dhepune@nic.in या ई-मेल आय.डी. वर सादर करण्यात यावी.

प्रस्तूत प्रकरणी शासनास यशाशिघ्र अहवाल सादर करावयाचा असल्याने कृपया प्रथम प्राधान्याने कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

प्रत: मा.अजित म. बाविस्कर- उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव सादर.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्र. ४२२,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई — ३२.

क्र. बैठक-२०२२/प्र. क्र. २७/विशि-३

दि. २०/०१/२०२२

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे,
सचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई,
संचालक, कला संचालनालय, मुंबई.

**विषय : राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालये परिसरात विद्यार्थीनीवर होणाऱ्या छेडछाडीच्या घटनेच्या अनुषंगाने हा परिसर छेडछाड मुक्त तसेच, सायबर गुन्हे मुक्त करण्याबाबत.**

महोदय,

मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या उपस्थितीत वरील विषयासंदर्भात दि. २०/०१/२०२२ रोजी सर्व विद्यापीठांचे कुलगुरु/कुलसचिव व संबंधितांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत प्राप्त निर्देशानुसार सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांकडून महिला तक्रार निवारण समिती स्थापन करणे व छेडछाडीच्या गुन्ह्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती गोळा करुन शासनास सादर करण्यात यावी.

1) महिला तक्रार निवारण समिती किती महाविद्यालयांमध्ये स्थापन केली आहे
2) विद्यार्थीनींच्या छेडछाडीसंदर्भात विद्यापीठ व महाविद्यालयीन परिसरात मागील दोन वर्षात किती गुन्ह्यांची नोंद झालेली आहे
3) या गुन्ह्यांची सद्यस्थिती
4) किती गुन्हे निकाली निघाले
5) छेडछाडीच्या घटना व सायबर गुन्हे होऊ नये म्हणून करण्यात येत असलेल्या उपाययोजना

महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्याबाबत यापूर्वी सूचना दिलेल्या आहेत. तथापि अशी समिती स्थापन झाली नसल्यास त्या लवकरात लवकर स्थापन करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्या.

वरीलप्रमाणे एकत्रित माहिती कृपया तात्काळ शासनास सादर करण्यात यावी.

आपला,

(अजित म. बाविस्कर)
उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र शासन